# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २७ ऑक्टोबर २०१६

## नगरपरिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक

## स्थानिक सुट्टी असली तरीही २९ ऑक्टोबरला नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याच्या सूचना

मुंबई, दि. २७: काही जिल्ह्यांमध्ये २९ ऑक्टोबर २०१६ रोजी दिवाळीनिमित्त स्थानिक सुट्टी असली तरीही त्या दिवशी नगरपरिषद, नगरपंचायत व नगरपरिषदेच्या थेट अध्यक्षपदाच्या निवडणुकांसाठीचे नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात यावीत, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगातर्फे सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने २१२ नगरपरिषद, नगरपंचायतीच्या व नगरपरिषदेच्या थेट अध्यक्षपदासाठी चार टप्प्यातला निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. पहिल्या टप्प्यात २५ जिल्ह्यांतील १४७ नगरपरिषदा व १८ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका; तसेच १४७ नगरपरिषदांमधील अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकांसाठी २७ नोव्हेंबर २०१६ रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी नामनिर्देशनपत्रे भरण्याची २९ ऑक्टोबर २०१६ ही अंतिम मुदत आहे. या दिवशी काही जिल्ह्यांमध्ये दिवाळीनिमित्त स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना १६ जानेवारी १९५८ च्या शासन निर्णयानुसार स्थानिक सुट्ट्या देण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. या निर्णयातील परिच्छेद ५ मधील तरतूद लक्षात घेता स्थानिक सुट्ट्या निवडणूक नियमांतर्गत [नियम २ (बी-१)] सार्वजनिक सुट्ट्या म्हणून गणल्या जात नाही. त्यामुळे २९ ऑक्टोबर २०१६ रोजी स्थानिक सुट्टी असली तरीही नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात यावी, असेही आयोगाच्या पत्रकात नमूद केले आहे.

0-0-0